नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २२/०७/२०२५ (मंगळवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक २१/०७/२०२५ रोजी भिवापुर पोलीस पो.स्टे. हददीत पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा सोमनाळा गावा जवळ नाकाबंदी केली असता टिप्पर क्रमांक एम.एच. ३६ ए.ए. ५५०५ हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक अविनाश बलदेव ढबाले, वय २५ वर्षे, रा. तास, ता. भिवापुर जि. नागपुर याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव मधुसुदन चापेकर, रा. बुधवारी पेठ, उमरेड, जि नागपुर असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष **१)** टिप्पर क्रमांक एम.एच. ३६ ए.ए. ५५०५ किमती १५,००,००० /—रूपये **व २) ५** ब्रास रेती किंमती २५,०००/— रूपये आणि असा एकुण १५,२५,०००/ रूपयेचा मुद्देमाल जप्त केला.

**नमुद** ट्रक चालक आणि मालक **याच्या** विरूध्द पोस्टे भिवापुर येथे **कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## कन्हान पोलीसांची कामगिरी

पो.स्टे. कन्हान :— दिनांक २२/०७/२५ रोजी कन्हान पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, नागपुर जिल्हयातुन हद्दपार आरोपी सुमेश भिमराव रामटेके, वय ३२ वर्षे, रा प्रगतीनगर, कन्हान हा गहुहिवरा रोड लगत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ च्या पुला खाली हातात तलवार घेवुन फिरत आहे. अशी माहीती मिळताच पोलीस तात्काळ सदर घटनास्थळी पोहचले तेथे त्यांना आरोपी सुमेश भिमराव रामटेके, वय ३२ वर्षे, रा प्रगतीनगर, कन्हान हा हातात तलवार घेवुन फिरतांना मिळुन आला. नमुद आरोपी हा मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या दिनांक ११/११/२०२४ चे आदेशान्वये नागपुर जिल्हयातुन १ वर्षाकरीता हद्दपार असल्याने त्याला नागपुर जिल्हयात येण्याची परवानगी घेतली किंवा कसे याबाबत विचारना केली असता त्याने कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे समजले. पोलीसांनी पंचासमक्ष एक धारदार लोखंडी तलवार किंमत ५०० /— रूपये असा मुददेमाल पंचासमक्ष जप्त केला.

**आरोपी नामे** सुमेश भिमराव रामटेके, वय ३२ वर्षे, रा प्रगतीनगर, कन्हान **याच्या विरूद्ध पोस्टे कन्हान येथे कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदा सहकलम ४/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

## अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू काढणाऱ्या /विक्री करणाऱ्या आरोपीतांवर, नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, २७ गुन्हे नोंद एकुण ३,०९,३८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २१/०७/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विशेष मोहीम राबवुन विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या मोहाफुल दारू काढणाऱ्यांवर, बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू , सडवा असा एकुण ३,०९,३८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन जलालखेडा येथे आरोपी** आरोपी नामे १) प्रकाश माधवराव भोसले, वय ४५ वर्षे २) अजय शेरू भोसले, वय २७ वर्षे ३) बाबा सत्यम भोसले, वय ३३ वर्षे ४) राजेंद्र जर्नाधन पवार, ४९ वर्षे ५) गाना रोहील घोसले, वय २५ वर्षे ६) जिगर जगदिश पवार,

वय २५ वर्षे ७) दिनेश रामचंद्र बनसरे ,वय ३५ वर्षे आणि ८ महिला आरोपी यांचेवर **११ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे १) सुखदास बिन्सी मडावी, वय ७५ वर्ष, रा. वरघाट , २) मनराज रामनाथ उईके, वय ३० वर्ष, रा. बाथिया पालोरा, ३)घनशाम बिजु उईके, वय ३५ वर्ष, रा पिंडकापार, ४) पंजाब माधो टेकामख्त्र, वय ५० वर्ष, रा चोरबाहुली, ५) अमृत राधेशाम कोकोडे, वय ४१ वर्ष, रा करवई ६) रमेश उर्फ लक्ष्मण भंगी दशमेर, वय ४५ वर्ष, रा. वरघाट यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे १) शिवरात तोताराम पवार वय ३२ वर्ष रा डोंगरगाव ता काटोल, २)पुरूषोत्तम रमेश काटोले रा. वडली खुर्द ता काटोल जि नागपुर आणि तीन महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी १ **गुन्हा नोंद आहे**, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी नामे १) राजकुमार गरिबा बीरबल, वय ४७, वर्ष रा राजोला ता कुही, २) रविद्र बळीराम लाडे, वय ५६ वर्ष, रा राजोला ता कुही यांचेवर प्रत्येकी १ **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १) विलास सुरेश माळोदे, वय ४६ वर्ष, नवनीत नगर, नागपुर, हमु. मेंठेपठार यांचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे १)सतिश वामनराव कुभरे,वय ५६ वर्षे, रा प्लॉट क्रं. ५१ हुडकेश्वर रोड, नागपुर याचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे रामकिसन श्रिराम माहुरे, वय ५० वर्षे, रा. पोही, ता. हिंगणा, जि नागपुर याचेवर **गुन्हा नोंद आहे.** अशा **आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये २७ गुन्हे दाखल करून देशी दारू, मोहाफुल दारू, सडवा ,इतर साहीत्य असा एकुण ३,०९,३८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**





## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६६२ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २२/०७/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २२ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६६२ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३४ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे २९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २८ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे १७ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २५ आरोपी अशा एकुण ९९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १२३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३९ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २९  आरोपी आणि पोलीस स्टेशन खापरखेडा येथे ३३ आरोपी अशा एकुण १०१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी  येथे २८ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार  येथे येथे २९ आरोपी अशा एकुण ११३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ३५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १२८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २२ पोलीस स्टेशन एकुण ६६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**






पोलीस स्टेशन,रामटेक.



## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक २१/०७/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक २२/०७/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्री बापु रोहोम, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. तसेच पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत अण्णाभाऊ साठे नगर, पेठ बुधवार, काळे चौक, हत्तीखाना, सावरगाव रोड,भटपुरा येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले. सदर कोबिंग ऑपरेशन श्री बापु रोहोम यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. तसेच सावरगाव रोड आणि गळपुरा चौक येथे नाकाबंदी करून संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये पोलीस स्टेशन काटोल चे अधिकारी, अंमलदार आणि दंगा नियत्रंण पथकाचे अंमलदार हजर होत








MP50 G 2776




मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने